**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०७ / सांगली |
| २ | अपीलकर्त्या | श्रीमती छाया नामदेव कांबळे<br>रा. सि.स.नं.१२५३-अ, गावभाग, हरिपूर रोड,<br>सिध्दार्थनगर, सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | भूमि संपादन अधिकारी, सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हाधिकारी, सांगली |

वरील घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. सदरहू माहिती जिल्हाधिकारी कार्यालय लेखा शाखेशी निगडीत असून ती माहिती अपीलकर्त्यास देण्यात येणार असल्याने, अपीलकर्त्याने आपले अपील मागे घेतले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २० .५.२००८

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर
रा.फलटण, गोळीबार मैदान, विराम बंगल्याजवळ,
फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, फलटण

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१ / सातारा / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर
रा.फलटण, गोळीबार मैदान, विराम बंगल्याजवळ,
फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण,
जि.सातारा श्री.संभाजी मल्हारी हेरवाडे

जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, फलटण
श्री.हिम्मत हिंदुराव खराडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>गट नं.७०१/१ व ७०१/२ या राजाळे येथील जमिनींचा ताबा मंडल अधिकारी, राजाळे यांनी आजतागायत दिलेला नाही असे माहिती अधिकारी फलटण कळवितात, मग गट नं.७०१/१ चा गांव न.नं.७-ब का भरला? गट नं.७०२ ची वहिवाट का दाखविली? सन २००५-२००६ ची पीकपहाणी का नोंदली. | |

## विवेचन

जमिनीच्या ७/१२ च्या उताऱ्यावरील फेरफार नोंद व पिकपहाणीस अन्य व्यक्तींचे नाव का व कसे आले याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण यांच्याकडे मागितली होती. त्यांनी तलाठी, राजाळे, तालुका फलटण यांच्याकडून ही माहिती मागवून त्यांना विहित मुदतीत ती पुरविली. त्याने समाधान न झाल्याने श्री.नाईक निंबाळकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार फलटण यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते फेटाळले. त्याविरुध्द श्री.नाईक निंबाळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संबंधित जमिनीबाबत अनेक वर्षे चालत आलेल्या वादाची पार्श्वभूमी या अर्जाला आहे. श्री.नाईक निंबाळकर यांनी विविध अर्जाद्वारे हा प्रश्न मांडला असून कार्यवाहीची अपेक्षा केलेली आहे. त्या अनुषंगाने तहसीलदार कार्यालयाने वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे व माहितीही त्यांना देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. न्यायालयातील दाव्याप्रमाणेच महसूल आयुक्तांसह विविध पातळ्यांवरील नऊ अपिले श्री.नाईक निंबाळकर यांनी केली असून सध्या उच्च न्यायालयात विषय प्रलंबित आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. श्री.नाईक

निंबाळकर यांनी ही वस्तुस्थिती मान्य केली मात्र सरकारच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर फेरफार नोंद का मंजूर केली व त्यात पिकपहाणी व कसणाराचे नाव म्हणून श्री.शरदचंद्र उल्हासराव निंबाळकर यांचे नाव का नोंदले, ही माहिती आपल्याला दिली गेली नाही असे श्री.नाईक निंबाळकर यांनी नमूद केले. संबंधित विषय न्यायालयीन प्रक्रियेत असून माहितीच्या अधिकारात आवश्यक ती माहिती वेळोवेळी देण्यात आलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.संभाजी मल्हारी हेरवाडे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता विविध न्यायालयांसह अनेक पातळ्यांवर या विषयाबाबतची कायदेशीर प्रक्रिया होत आली आहे. माहितीच्या अधिकारांतर्गत येणारी माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली आहे. ऊर्वरित भाग प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ८.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर
रा.फलटण, गोळीबार मैदान, विराम बंगल्याजवळ,
फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, फलटण

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१ / सातारा / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर
रा.फलटण, गोळीबार मैदान, विराम बंगल्याजवळ,
फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण,
जि.सातारा श्री.संभाजी मल्हारी हेरवाडे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, फलटण
श्री.हिम्मत हिंदुराव खराडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>गट नं.७०१/१ व ७०१/२ या राजाळे येथील जमिनींचा ताबा मंडल अधिकारी राजाळे यांनी आजतागायत दिलेला नाही असे माहिती अधिकारी फलटण कळवितात, मग गट नंर्७०१/१ चा गांव न.नं.७-ब का भरला? गट नं.७०२ ची वहिवाट का दाखविली? सन २००५-२००६ ची पीकपहाणी का नोंदली. | |

## विवेचन

जमिनीच्या ७/१२ च्या उताऱ्यावरील फेरफार नोंद व पिकपहाणीस अन्य व्यक्तीचे नाव का व कसे आले याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.राजेजीराव विठ्ठलराव नाईक निंबाळकर यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण यांच्याकडे मागितली होती. त्यांनी तलाठी, राजाळे, तालुका फलटण यांच्याकडून ही माहिती मागवून त्यांना विहित मुदतीत ती पुरविली. त्याने समाधान न झाल्याने श्री.नाईक निंबाळकर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार फलटण यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते फेटाळले. त्याविरुध्द श्री.नाईक निंबाळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संबंधित जमिनीबाबत अनेक वर्षे चालत आलेल्या वादाची पार्श्वभूमी या अर्जाला आहे. श्री.नाईक निंबाळकर यांनी विविध अर्जांद्वारे हा प्रश्न मांडला असून कार्यवाहीची अपेक्षा केलेली आहे. त्या अनुषंगाने तहसीलदार कार्यालयाने वेळोवेळी कार्यवाही केलेली आहे व माहितीही त्यांना देण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. न्यायालयातील दाव्याप्रमाणेच महसूल आयुक्तांसह विविध पातळ्यांवरील नऊ अपिले श्री.नाईक निंबाळकर यांनी केली असून सध्या उच्च न्यायालयात विषय प्रलंबित आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. श्री.नाईक

निंबाळकर यांनी ही वस्तुस्थिती मान्य केली मात्र सरकारच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर फेरफार नोंद का मंजूर केली व त्यात पिकपहाणी व कसणारांचे नाव म्हणून श्री.शरदचंद्र उल्हासराव निंबाळकर यांचे नाव का नोंदले, ही माहिती आपल्याला दिली गेली नाही असे श्री.नाईक निंबाळकर यांनी नमूद केले. संबंधित विषय न्यायालयीन प्रक्रियेत असून माहितीच्या अधिकारात आवश्यक ती माहिती वेळोवेळी देण्यात आलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.संभाजी मल्हारी हेरवाडे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता विविध न्यायालयांसह अनेक पातळ्यांवर या विषयाबाबतची कायदेशीर प्रक्रिया होत आली आहे. माहितीच्या अधिकारांतर्गत येणारी माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली आहे. ऊर्वरित भाग प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ८.५.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भूपाल लगमाण्णा कुमटाळे
सहावी गल्ली, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली,
जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम,
बाहुबली, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१० / कोल्हापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि.१३.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भूपाल लगमाण्णा कुमटाळे
सहावी गल्ली, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक, श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम,
बाहुबली, जि.कोल्हापूर श्री.अजितकुमार पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.११.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम या संस्थेच्या सन १९६० ते २००० या कालावधीतील कामकाजाबाबत व श्री.बी.टी.बेडगे यांच्याबाबतची नेमणूक झाल्याची तारीख व कमी केल्याची तारीख, निवृत्तीची तारीख, उपसंचालकपदी निवड झाल्याची तारीख, स्कूल कमिटी अध्यक्षपदाचा कार्यकाल. तसेच श्री.गोमटेश बी.बेडगे याची कंवठेसार हायस्कूलकडे मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाल्याची तारीख, श्री.एम.जे.शहा विद्या मंदिर, बाहुबली या संस्थेकडे वर्ग केल्याची तारीख. डॉ.सुभाषचंद्र अक्कोळे याचा एक सदस्य चौकशी अहवालाची नक्कल |

## विवेचन

श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली, जि.कोल्हापूर या संस्थेच्या सन १९६० ते २००० श्री एम.जे.शहा विद्यामंदिरातील शिक्षक श्री.बी.टी.बेडगे, तसेच श्री.गोमटेश बी.बेडगे यांच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.भूपाल लगमाण्णा कुमटाळे यांनी अध्यक्ष, श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली, जि.कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. श्री.कुमटाळे यांनी प्रथम अपील केले नाही. आपली संस्था माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, त्यामुळे हा अधिनियम आपल्याला लागू नाही, असे संस्थेचे म्हणणे आहे. आपली संस्था सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व दि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० खाली नोंदविलेली संस्था आहे, असे अध्यक्षांनी श्री.कुमटाळे यांच्या दोन अर्जावर कळविले. या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होतो हे दर्शविणारी माहिती अपीलकर्त्याने नमूद केलेली नाही. तसेच संस्थेला अनुदान, जमीन आदींबाबत शासकीय सहाय्य मिळाल्याचे नमूद केलेले नाही. श्री.कुमटाळे हे सन १९८० ते १९९२ या काळात संस्थेच्या सेवेत होते. त्याविषयीच्या वादासंबंधात त्यांनी कामगार न्यायालयात दाखल केलेले दावे प्रलंबित असल्याचे कागदपत्रात नमूद केले आहे.

संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होण्याच्या संदर्भातील मतभेदाच्या अनुषंगाने संस्थेच्या कामकाजाच्या संदर्भातील माहिती बाजूला ठेवली तरी संस्थेच्या

विद्यालयाविषयीची माहिती दिली जाणे आवश्यक आहे. विद्यालयाला शासकीय वेतन-वेतनेतर अनुदान मिळत असल्यामुळे विद्यालय सार्वजनिक प्राधिकरण ठरते, म्हणून शिक्षकांविषयाची मागितलेली माहिती देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली, जि.कोल्हापूर या संस्थेच्या एम.जे.शहा विद्यालयातील शिक्षकांविषयाची मागितलेली माहिती अपीलकर्त्यास १५ दिवसात देऊन अध्यक्ष, श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली, जि.कोल्हापूर यांनी पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील<br>शितल, दमाणी हायस्कूलचे पुर्वेस, चांदणी चौक,<br>सांगली - ४१६ ४१६ |
| ३ | जन माहिती अधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हजर होते. अर्जदाराची मागणी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नियम ४ नुसार स्वेच्छेने माहिती तयार करून प्रदर्शित केलेल्या संचिका पाहणी करण्याची होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली होती, मात्र ती अपूर्ण असल्याचे व ती परिपूर्ण करून अपीलकर्त्यास देण्यास विलंब झाला असल्याचे त्यांनी मान्य केले. माहिती निःशुल्क देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सदरची माहिती विहित मुदतीमध्ये प्रसिध्द करणे, वेळोवेळी ती सुधारित करणे आवश्यक होते.

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणातील संबंधी कार्ये पालन करणे हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे कर्तव्य होते. त्यामध्ये कसूर झाल्याचे दिसून येते, ही गंभीर बाब असून या संदर्भात प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शहानिशा करून कलम ४ अन्वये केलेल्या कार्यवाहीचा अहवाल हा आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसात आयोगास सादर करावा.

पुणे
दि. २२.५.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२४/ कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | सौ. उमा अशोक भालकर<br>रा. त्रिमुर्ती, १७/१, सम्राटनगर, सरनाईक माळ, कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | पोलीस उपअधीक्षक (मु) कोल्हापूर जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस अधीक्षक, कोल्हापूर जि. कोल्हापूर |
| ५ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिमी | श्रीमती मनिषा अशोक भालकर यांची बदली पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांचेकडील आदेश क्र. ३३/अ.शा//म.अ.भालकर /२००७ दि. २०.३.२००७ अन्वये चंदगड पोलीस ठाणे ते पोलीस मुख्यालय कोल्हापूर अशी करण्यात आली त्या संदर्भातील पत्रकाची माहिती |

वरील तीनही घटकात झालेल्या चर्चेनुसार अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** ३१ **.५.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे मार्च २००७ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी अल्पबचत सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२ / सांगली |
| २ | अपीलकर्ता | श्री. बंडोपंत मायाप्पा ढेबरे<br>अध्यक्ष, संत गाडगेबाब ग्रामीण विकास संस्था,<br>राजोबांचीवाडी, पो. माडग्याळ, ता. जत जि. सांगली |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, जत ता. जत, जि. सांगली |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, जत ता. जत, जि. सांगली |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जत तहसील कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या तालुक्यातील मंडल अधिकारी, तलाठी यांची नावे, पदनाम, कार्यालय, त्यांना नेमून दिलेल्या मुख्यालयाचे नाव, सध्याचे मुख्यालयाशी केव्हापासून कार्यरत आहेत, मुख्यालयात राहतात काय, राहत असल्यास शासकीय निवास / खाजगी, खाजगी असल्यास घरमालकाचे पूर्ण नाव व पत्ता, रहात नसल्यास येणे जाणे कोठून करतात, वेतनात घरभाडे भत्ता घेतात काय व किती घेतात, आतापर्यंत घरभाडेपोटी किती रक्कम घेतली त्याचा तपशील | |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले व सुधारित माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी देण्याचे मान्य केले आले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. सुधारित माहिती ७ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केलेले आहे. त्याअनुषंगाने आयोगास पूर्तता अहवाल दि. ५.६.२००८ पर्यंत सादर करावा.

पुणे
दि. २८.५.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ